# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः24.05.2025** **वारःशनिवार**

---

1. पोलिस विभागाने नवीन फौजदारी कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे दोषसिद्धी वाढवावी- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
2. पूर्वमोसमी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसानभरपाई देण्यास शासन तत्पर
3. गडचिरोली जिल्ह्यात पोलिस चकमकीत चार जहाल नक्षलवादी ठार आणि
4. राज्याच्या विविध भागात पावसाचा जोर कायम; कोकण आणि मध्य महाराष्ट्रात आजही मुसळधार पावसाचा अंदाज

**<u>मुख्यमंत्री-पोलिस-सांगली</u>**

राज्यात आदर्श पोलीस प्रशासन निर्माण करण्यासाठी लोकसंख्येच्या अनुरुप पोलीसांची संख्या ठेवली जाणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं. गृह विभागामार्फत नव्याने 40 हजार पोलीसांची भरती केली आहे. यापुढेही राज्यात पोलीस भरतीला प्राधान्य देणार असल्याचं ते म्हणाले.

सांगली जिल्हा पोलीस दलाच्या वतीने बांधण्यात आलेल्या तीन इमारतींचं उद्घाटन आणि निवासस्थान इमारतीच्या भूमिपूजन कार्यक्रमात ते बोलत होते. प्रत्येक जिल्ह्यात फॉरेंन्सिक व्हॅन उपलब्ध करुन देण्यात येत असून सायबर गुन्ह्यांचा छडा लावण्यात महाराष्ट्र पोलीस देशात अव्वल असल्याचे फडणवीस यांनी सांगितलं. यावेळी बोलताना ते म्हणाले.....

**कायद्याचा जो काही एक भीती ही तेंव्हाच राहील. ज्यावेळी अशा गतीने लोकांना शिक्षा येईल. आज जर लोकांना हे माहिती असेल की आपण आज गुन्हा केला तर झाली शिक्षा तर झाली नाहीतर मरतपर्यंत खटला चालतो. तर दुसरा गुन्हा करण्याकरिता, मग त्यांना मला असं वाटतं की कुठली भीती उरत नाही, आणि म्हणून त्या संदर्भात मोठ्या प्रमाणात आता बदल झालेला आहे. विशेषतः रेट ऑफ कन्विक्शन मध्येही आता महाराष्ट्राने खूप चांगली भरारी घेतली आहे. आपण नऊ टक्क्यांपर्यंत खाली गेलो होतो. आता पन्नास टक्क्यांवर आपण आलेलो आहोत. पण अजूनही सेटिस्फेक्शन नाहीये. आपल्याला सत्तर, पंच्याहत्तर टक्क्यांपर्यंत रेट ऑफ कन्विक्शन न्यायचा आहे**

**आणि कुठल्याही परिस्थितीमध्ये गुन्हेगार सुटला नही पाहिजे अशा प्रकारचा प्रयत्न आपल्याला करायचा आहे.**

**<u>मुख्यमंत्री -इचलकरंजी</u>**

पूर्वमोसमी पावसाचा फाटका बसलेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येतील आणि त्यानंतर त्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी सरकार तत्पर असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते काल कोल्हापूर इथं माध्यमांशी बोलत होते. जिल्ह्यातील इचलकरंजी शहरांच्या विकासाच्या योजनांसाठी सर्व प्रस्तावांना न्याय देण्याचे शासनाचे धोरण असून शहराच्या विकासासाठी मदत करण्याचं आश्वासन फडणवीस यांनी दिलं. त्यांच्या हस्ते इचलकरंजी विधानसभा मतदारसंघातील 713 कोटी रुपयांहून अधिक विविध विकास कामांचं उद्घाटन आणि लोकार्पण झालं.

पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणातील दोषींवर कडक केली जाईल अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी बोलताना दिली. दरम्यान वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात फरार असलेल्या राजेंद्र हगवणे आणि सुशील हगवणे या दोन आरोपींना पोलिसांनी काल अटक केली. न्यायालयानं या दोघांना 28 मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

**<u>सहकार-पवार</u>**

सहकार चळवळ टिकण्यासाठी आणि वाढण्यासाठी आवश्यक सहकार्य करू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील विश्वनाथराव पाटील मुरगूड सहकारी बँकेचा अमृत महोत्सवी वर्ष सोहळा पवार यांच्या उपस्थितीत पार पडला; त्यावेळी ते बोलत होते. कोणत्याही योजनेसाठी निधी कमी पडू देणार नसल्याचं पवार यांनी यावेळी सांगितलं. जिल्ह्यातील काळम्मावाडी धरणाची गळती रोखण्यासाठी आवश्यक तो निधी देण्यात येईल, असंही पवार म्हणाले.

**<u>आदिवासी-अंगणवाडी</u>**

पंतप्रधानांच्या आदिवासी न्याय महामोहिमेअंतर्गत राज्यातल्या काही अत्यंत दुर्गम आदिवासी भागात 38 नवीन अंगणवाडी केंद्रांना मंजुरी मिळाली आहे. वंचित भागातील मुले आणि गर्भवती महिलांसाठी पोषण आणि आरोग्यसेवेची उपलब्धता वाढवणे हे उपक्रमाचे उद्दिष्ट आहे, अशी माहिती महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिली आहे.

**<u>होळकर-त्रिशताब्दी</u>**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची 300वी जयंती राज्यभर मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. या निमित्ताने नाशिक, पुणे आणि नागपूर इथं विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. 25 ते 31 मे दरम्यान हे कार्यक्रम होणार असल्याची माहिती मंत्री आशिष शेलार यांनी दिली आहे.

जालना शहरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचं स्मारक  उभारण्यात येणार असून त्यासाठी शासन सहकार्य करणार असल्याची ग्वाही वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी दिली आहे.

**शेत रस्ते**

शेतीच्या बांधावरील पारंपरिक अरुंद शेतरस्ते 12 फूट रुंद करण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे दिली आहे. याबाबतचा शासन आदेश जारी करण्यात आला आहे. शेत रस्त्याची आवश्यकता तपासावी, शेजारच्या भूधारकाच्या वहिवाटीच्या हक्कांचा, त्यांच्या अडचणी, अपेक्षांचा विचार करावा. रस्त्याची रुंदी वाढवण्यासाठी यांत्रिकीकरणानुसार निर्णय घ्यावा, अनावश्यक रुंदीकरण करू नये अशा सूचना महसूल अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

**तिरंगा यात्रा-बुलडाणा**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ काल बुलडाणा जिल्ह्यातील लोणार परिसरात तिरंगा यात्रा काढण्यात आली. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत शिवसेनेच्यावतीने या यात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी जाधव यांच्या हस्ते माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना जाधव म्हणाले......

**जवानांनी जे काही शौर्य दाखवलं त्यांचा सन्मान करण्यासाठी भारतमातेची प्रतिमा घेऊन आणि सर्व या परिसरातील जे काही सीमेवर लढणारे सैनिक होते त्या सगळ्या सैनिकांचा सन्मान करून तिरंगा रॅली आपल्या जगप्रसिद्ध लोणार सरोवर या ठिकाणी काढणयात आली आणि मोठ्या जल्लोषामध्ये या रॅलीचा समारोप करण्यात आलेला.**

सोलापूर जिल्ह्यातील अकलूज इथंही माजी आमदार राम सातपुते यांच्या नेतृत्वाखाली या यात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं.

**योग-सोलापूर**

येत्या 21 जून रोजी होणाऱ्या 11 व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर सोलापूरमध्ये योग अभ्यास शिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं; केंद्रिय संचार ब्यूरो आणि जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे आयोजित या दोन दिवसांच्या शिबिराचं उद्घाटन अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह यांच्या हस्ते काल करण्यात आलं.

**पदवी प्रदान-नाशिक**

नाशिक इथल्या कॉम्बॅट आर्मी एव्हिएशन ट्रेनिंग स्कूलच्या 43 व्या लढाऊ वैमानिकांच्या तुकडीसह एव्हिएशन प्रशिक्षकांच्या 42 व्या तुकडीचा पदवीप्रदान सोहळा काल पार पडला. या वैमानिक, प्रशिक्षकांच्या तुकडीने दिमाखदार संचलन करत वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना मानवंदना दिली. आर्मी

एव्हिएशन कोरचे महासंचालक आणि कर्नल कमांडंट लेफ्टनंट जनरल विनोद नांबियार हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

**<u>नक्षलवादी-गडचिरोली</u>**

गडचिरोली जिल्ह्यात भामरागड तालुका आणि छत्तीसगड राज्याच्या सीमावर्ती भागातल्या जंगलात काल नक्षलवादी आणि पोलिस यांच्यात झालेल्या चकमकीत चार जहाल नक्षलवादी ठार झाले. घटनास्थळी मोठा शस्त्रसाठा सापडला आहे. मारले गेलेल्या नक्षलवादयांची ओळख पटली नसल्याची माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली आहे. दरम्यान, गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील बिनागुंडा इथून ताब्यात घेतलेल्या दोन नक्षलींना पोलिसांनी अटक केली असून न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. राधिका बुचन्ना मडावी आणि पोडिया आयतू कुंजाम अशी त्यांची नावं आहेत.

**<u>कुंभमेळा-नाशिक</u>**

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर इथं पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीकोनातून महिला, बालके आणि ज्येष्ठ नागरीक यांच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घेण्याची सूचना विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली आहे. गोऱ्हे यांनी कुंभमेळयाच्या अनुषंगाने विविध विषयांबाबत काल आढावा बैठक घेतली. त्यावेळी त्या बोलत होत्या.

**<u>खेलो इंडिया</u>**

दीवच्या घोघला समुद्र किनाऱ्यावर सुरू असलेल्या खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी कालही चमकदार कामगिरी केली. मुंबईच्या वैभव काळेने पारंपरिक पेंचक सिलट प्रकारात सुवर्ण, रौप्य आणि कास्य अशी तिरंगी पदकं जिंकत कालचा दिवस गाजवला. कबड्डीमध्ये महाराष्ट्राच्या दोन्ही संघांना कास्य पदकावर समाधान मानावं लागलं. या स्पर्धेत 5 सुवर्ण, 4 रौप्य, आणि 9 कास्य अशी एकंदर 18 पदकं जिंकून महाराष्ट्राचा संघ दुसऱ्या स्थानावर आहे.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत, लखनौ इथं झालेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने काल रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा 42 धावांनी पराभव केला. आज पंजाब किंग्जचा सामना दिल्ली कॅपिटल्स बरोबर जयपूर इथं होणार आहे, दोन्ही संघ आधीच स्पर्धेतून बाहेर पडले असल्याने, या सामन्याचा प्लेऑफच्या शर्यतीवर कोणताही परिणाम होणार नाही.

**<u>पाऊस</u>**

राज्याच्या विविध भागात कालही जोरदार पाऊस झाला. रत्नागिरी, कोल्हापूर, आणि सातारा जिल्ह्यात पावसाची संततधार सुरू होती. कोयना, कृष्णा, वेण्णासह इतर सर्वच नदीच्या पाणीपातळीत

मोठी वाढ झाली आहे. पंचगंगेच्या पाणी पातळीत वाढ होत असून राजाराम बंधाऱ्यावर पाणी आलं आहे. त्यामुळे येथील वाहतूक बंद करण्यात आली आहे. भोगावती नदीदेखील तुडूंब भरली आहे.

**हवामान**

नैऋत्य मोसमी पाऊस दोन दिवसांत केरळमध्ये दाखल होण्यास अनुकूल वातावरण तयार झालं असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. अरबी समुद्राच्या दक्षिण आणि मध्यपूर्व भागांवर कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. त्यामुळे कोकण आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज आहे. कोकणात बहुतांश भागांत तर मध्य महाराष्ट्रात काही भागांत वादळी वाऱ्यासह पाऊस पडेल; मराठवाडा आणि विदर्भातही काही भागांत मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज पुणे वेधशाळेने वर्तविला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.